# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 15 October 2026
## Time 7.10 to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी बँका, मायक्रो-फायनान्स कंपन्यांनी तगादा लावू नये, सरकारची ताकीद
- राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेला पुढील पाच वर्षांसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी-रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा बोनस देण्याचा निर्णय
- साखरेची आधारभूत किंमत आणि ऊस उत्पादकांच्या मागण्यांसंदर्भात केंद्र सरकारकडे शिष्टमंडळ नेणार- सहकार मंत्र्यांचं आश्वासन

आणि

- प्रदेश काँग्रेस कमिटीचा छत्रपती संभाजीनगर इथं जनआक्रोश दुष्काळ मोर्चा

****

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते काल मुंबईत मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या आणखी ३९ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, यामध्ये नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड आणि मुदखेड या दोन तालुक्यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मराठवाड्यातल्या सर्व तालुक्यांसह राज्यातल्या एकूण ३०४ तालुक्यात १२ दुष्काळी सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

पिण्याच्या पाण्यासाठी गरजेनुसार टँकरचा पुरवठा करण्यात येत असून, टँकरवर जीपीएस ट्रॅकर लावण्यात आले आहेत. चाऱ्याच्या पुरवठ्याचा आढावा घेण्यात येत असून, जास्तीत जास्त चारा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. रबी पिकं घेणाऱ्या शेतकऱ्यांनी चारापिकं घेतल्यास सगळा चारा शासन हमीभावाने विकत घेईल, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद संबंधित सोसायट्या, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रो-फायनान्स कंपन्यांना दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, राज्यातल्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, पोहोचण्याचा मार्ग नसलेल्या शासकीय भूखंड वितरणाच्या धोरणात सुधारणा करायला तसंच बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं संत गजानन महाराज संस्थानाला मौजे गिरडा इथल्या जमिनीवर यात्रास्थळ विकासित करायला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासनाचे प्रमुख म्हणून २५ वर्षं पूर्ण केल्यानिमित्त राज्य सरकारने त्यांच्या अभिनंदनाचा ठरावही बैठकीत मंजूर केला.

****

राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेला पुढील पाच वर्षांसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती दिली. या कार्यक्रमासाठी ५३ हजार ४२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. देशातले सर्व ३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतल्या सुमारे तीन कोटी २० लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

आयडीबीआय बँकेच्या पुनर्रचनेलाही केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पुनर्रचित बँकेत भारत सरकार आणि 'लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' -LIC यांचा ३४ टक्के हिस्सा कायम राहील.

रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा कार्याधारित बोनस देण्यासही मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. ११ लाख ४० हजार कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार असल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव**

****

राज्यातल्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दिवाळीपूर्वी शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार आहेत. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली. यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

****

भारतीय कापूस महामंडळ-सीसीआयच्या वतीनं खरीप हंगाम २०२६-२७ साठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत आजपासून कापूस खरेदीला सुरुवात होणार आहे. खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक तयारीच्या सूचना सीसीआयने दिल्या आहेत. नोंदणी पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ आहे. यंदा सीसीआयकडून शेतकऱ्यांचा कापूस थेट खरेदी केला जाणार आहे.

****

साखरेची आधारभूत किंमत आणि ऊस उत्पादकांच्या रास्त आणि किफायतशीर दरासंदर्भातल्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींचं शिष्टमंडळ केंद्र शासनाकडे नेण्यात येईल, असं आश्वासन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिलं. राज्यातल्या विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांचं आर्थिक हित, साखरेच्या दरातली सुधारणा, ऊस वजनातली पारदर्शकता आणि साखर कारखान्यांच्या कार्यपद्धतीशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाचा २५ वर्षांचा प्रवास ‘जनसेवा से देशसेवा’ या मंत्राने प्रेरित असून, सेवा आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार कार्यरत आहे. सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा प्रयत्न या कार्यातून होत आहे. केंद्र सरकारनं सुरु केलेली आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, ही देखील याच प्रयत्नांचा भाग आहे. आज या योजनेविषयी जाणून घेऊ –

*देशातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं २०१८ मध्ये आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु केली. या योजनेंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतच्या रुग्णालयीन उपचारांचे आरोग्य संरक्षण उपलब्ध करून दिले जाते. पात्र लाभार्थ्यांना सूचीबद्ध सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये दुय्यम आणि तृतीय स्तरावरील उपचारांसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध होते. ही योजना गरीब कुटुंबांसाठी वरदान ठरली आहे.*

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

*आयुष्मान भारत योजनेचा विस्तार करत सरकारनं ७० वर्षे आणि त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना उत्पन्नाची अट न ठेवता आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. या ज्येष्ठ नागरिकांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. आतापर्यंत आयुष्मान भारत योजनेअंतर्गत सुमारे साडेतेरा कोटी रुग्णालयीन उपचारांना मंजुरी देण्यात आली आहे.*

****

प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथं जनआक्रोश दुष्काळ मोर्चा काढण्यात आला. क्रांतीचौक परिसरातून निघालेला हा मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समोर जाहीर सभेत विसर्जित झाला. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी डॉक्टर सिरीवल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, यांच्यासह विभागातले लोकप्रतिनिधी या मोर्चात सहभागी झाले होते. सरसकट शंभर टक्के कर्जमाफी, जीवनावश्यक वस्तूंच्या भावात स्थैर्य, पेयजल, चारा, रोजगार, आदी मागण्या त्वरित पूर्ण झाल्या पाहिजे अशी अपेक्षा खासदार डॉक्टर कल्याण काळे यांनी यावेळी व्यक्त केली.

****

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महिलांनी खचून न जाता सक्षमपणे कुटुंब व्यवस्था सांभाळावी आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी असं आवाहन आरोग्य आणि महिला बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केलं आहे. तुळजापूर शक्तीपीठ ते माहूर भक्तीपीठ यादरम्यान सेवा संकल्प अभियानांतर्गत धाराशिव इथं

नारीशक्ती संवाद कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. महिला आणि मुलींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसंच मुलींचं शिक्षण या काळात बंद पडू नये यासाठी आपलं सरकार काळजी घेणार असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाई निवारणार्थ ग्रामपंचायतनिहाय सूक्ष्म नियोजन करून कृती आराखडा तातडीने सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले. काल याबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

****